**पोलीस पाटलांना राज्यपाल पुरस्कार देण्याबाबत**

१)विशेष उल्लेखनिय सेवा पुरस्कार
२) उल्लेखनिय शौर्य पुरस्कार

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:- बीव्हीपी : २०००/सीआर-३४/पोल-८**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,**
**दिनांक :- १ आक्टोबर, २००८**

**प्रस्तावना:-** पोलीस पाटील हे शेतकरी संघटनेच्या तसेच इतर वेगवेगळ्या आंदोलनांच्यावेळी पोलीसांना सहकार्य करणे, कुटुंब कल्याण कार्यक्रमात भाग घेणे, लोकन्यायालयात पंच म्हणून कार्य करुन प्रकरणे निकालात काढण्यास मदत करणे, पूर परिस्थितीत समयसूचकतेने व योग्य ते गांभीर्य लक्षात घेऊन मदत करणे, कायदा व सुव्यवस्था राखणे, पोलीस तपासात अत्यंत गंभीर गुन्ह्यातील व इतर गुन्ह्यातील आरोपीची कुशलतेने व गुप्तपणे इत्यंभूत माहिती व ठावठिकाणा काढून त्यांना पकडून देण्यासाठी व गुन्हे उघडकीस आणण्यासाठी मदत करणे तसेच महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेचे निमंत्रक म्हणून काम पाहणे" इ. अनेक कामे पार पाडीत असतात. त्यांनी अशा कामात केलेल्या विशेष उल्लेखनीय कामासाठी अथवा/आणि अतुलनिय साहस/धाडस/शौर्य यासाठी राज्यपाल पुरस्कार देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

वरील प्रस्तावाचा शासनाने सांगोपांग विचार करुन राज्यातील पोलीस पाटलांना १) विशेष उल्लेखनिय सेवा पुरस्कार व २) उल्लेखनिय शौर्य पुरस्कार असे दोन राज्यपाल पुरस्कार सोबतच्या जोडपत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे सन २००८ पासून देण्यास शासन याव्दारे मान्यता देत आहे.

२. यासाठी होणारा खर्च "२०५५-पोलीस-११०, ग्राम पोलीस (००)(०१) पोलीस पाटील व मेवास पाटील (२०५३०२२१) इतर खर्च" या लेखाशीर्षाखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. सीआर-३४४/व्यय-७, दिनांक ११/०८/०८ व क्र. ३८३/०८/सेवा-५, दिनांक २५/०८/०८ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(शि. म. धुळे)
कार्यासन अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रति,
१) महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) सर्व विभागीय आयुक्त,
३) मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. राज्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) महालेखापाल-१/२, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर.
६) सर्व जिल्हाधिकारी
७) सर्व पोलीस अधिक्षक
८) सर्व उपविभागीय अधिकारी (जिल्हाधिकारी यांच्यामार्फत)
९) संगणक कक्ष, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई (शासनाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यासाठी)
१०) वित्त विभाग (व्यय-७), मंत्रालय, मुंबई
११) गृह विभाग (बीयुडी-१/पोल-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) निवडनस्ती (पोल-८) गृह विभाग, मंत्रालय, मुंबई

*****

**शासन निर्णय, गृह विभाग क्र. बीव्हीपी-२०००/सीआर-३४/पोल-८, दिनांक सप्टेंबर, २००८**

**सोबतचे जोडपत्र**

---

१. **पुरस्काराचे नांव** :-. महाराष्ट्र राज्यातील **पोलीस** पाटील यांना विशेष उल्लेखनिय सेवा किंवा उल्लेखनिय शौर्य राज्यपाल पुरस्कार .

२. **स्वरुप** :- वरील दोन्ही पुरस्कारांचे **स्वरुप राज्यपालांच्या सहीचे** (प्रशस्तीपत्र) व पाच हजार रुपये रोख रक्कम असे राहील. प्रशस्तीपत्राचा (सेवा आणि शौर्य पुरस्कार) विहित नमुना सोबत जोडला आहे.

३. **निकष**:- (अ) विशेष उल्लेखनिय सेवा पुरस्कार

विशेष उल्लेखनिय सेवा पुरस्काराकरिता पोलीस पाटलांनी खालीलं निकष पूर्ण करणे आवश्यक राहील.

(१) पुरस्कारासाठी पोलीस पाटील यांची सेवा किमान १० वर्षे झालेली असावी तसेच संबंधित पोलीस पाटील यांना उल्लेखनिय कामाकरीता १० प्रशस्तीपत्रके मिळालेली असावी.

(२) त्यांच्याविरुध्द न्यायालयात कोणताही खटला नसावा.

(३) चारित्र्य व सचोटी निर्विवाद असावी.

(४) कोणतीही लहान अथवा मोठी प्रशासकीय न्यायालयीन शिक्षा झालेली नसावी.

(ब) उल्लेखनिय शौर्य पुरस्कार

उल्लेखनिय शौर्य पुरस्काराकरिता पोलीस पाटलांनी खालील निकष पूर्ण करणे आवश्यक राहील:-

(१) यासाठी किती सेवा झाली याची अट नसावी. मात्र त्यासंबंधी केवळ घटना प्रसंग लक्षात घेण्यात यावा.

(२) त्यांच्याविरुध्द न्यायालयात कोणताही खटला नसावा.

(३) चारित्र्य व सचोटी निर्विवाद असावी.

(४) कोणतीही लहान अथवा मोठी प्रशासकीय न्यायालयीन शिक्षा झालेली नसावी.

(४) **पुरस्कारासाठी नावांची शिफारस करण्यासाठी कार्यपध्दती**:-

प्रत्येक पोलीस ठाणे प्रभारी यांनी त्यांच्या अधिपत्याखाली नेमणुकीस असलेल्या पोलीस पाटलांपैकी उल्लेखनीय काम करणाऱ्या किंवा शौर्य बजावणाऱ्या पोलीस पाटलांचे नांव/नांवे संबंधित उपविभागीय दंडाधिकारी यांच्याकडे घटनांच्या तपशीलासह दि.३० नोव्हेंबर पर्यंत पाठवावीत. सदर पुरस्काराची निवड व देण्याची प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी प्रत्येक घटकाकडून/

कार्यालयाकडून अशाप्रकारची शिफारस होण्यासाठी कालमर्यादा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे :-

(अ) पोलीस ठाणे प्रभारी यांच्याकडून उपविभागीय दंडाधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेल्या शिफारशी त्यांनी पोलीस अधिक्षक यांचकडे ३१ डिसेंबर पर्यंत पाठवाव्यात.

(क) पोलीस अधिक्षक/ जिल्हाधिकारी यांनी शासनाकडे ३१ जानेवारी पर्यंत प्रस्ताव पाठवावेत.

(ड) जिल्हा पोलीस अधिक्षक यांच्याकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावाची छाननी करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी खालील अधिकाऱ्याचा अंतर्भाव असलेली समिती गठीत करण्यात यावी.

१. जिल्हाधिकारी -अध्यक्ष

२. पोलीस अधिक्षक -सदस्य

३. निवासी उप जिल्हाधिकारी -सदस्य

४. पोलीस उप अधिक्षक (प्रशासन)-सदस्य सचिव

(इ) वरील समिती उपविभागीय दंडाधिकारी यांच्या कडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करुन एकास दोन या तत्वाला अनुसरुन शासनास राज्यपाल पुरस्काराच्या नावाची शिफारस करील.

(फ) शासन पातळीवर प्राप्त होणाऱ्या नावांमधून पुरस्कारांसाठी नावांची अंतिम निवड खालील समितीमार्फत करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| (अ) अपर मुख्य सचिव (गृह) | - | अध्यक्ष |
| (ब) महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई | - | सदस्य |
| (क) प्रधान सचिव (महसूल) | - | सदस्य |
| (ड) संबंधित सह सचिव/उपसचिव, गृह विभाग (पोल-८) | - | सदस्य सचिव |

(५) राज्यपाल पुरस्कार ज्या वर्षासाठी असेल त्या वर्षाच्या पुढील वर्षी दि. १ मे रोजी पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

(६) राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील एका पोलीस पाटलास <u>एक विशेष उल्लेखनिय सेवा</u> किंवा <u>एक उल्लेखनिय शौर्य पुरस्कार</u> यानुसार प्रत्येक वर्षी एकूण ३३ पुरस्कार देण्यात येतील.

(७) राज्यपाल पुरस्कार स्विकारण्यास येणाऱ्या पोलीस पाटलास तो कर्तव्यार्थ आहे असे समजून कनिष्ठतम शासकीय कर्मचाऱ्यास लागू असणाऱ्या दराने प्रवासभत्ता देण्यात येईल.

(८) पुरस्कार प्राप्त पोलीस पाटील यांना प्रशस्तीपत्र व पाच हजार रुपये रोख देण्यासाठी तसेच प्रवासभत्ता देण्यासाठी येणारा खर्च "२०५५-पोलीस-११०, ग्राम पोलीस (००)(०१) पोलीस पाटील व मेवास पाटील (२०५३०२२१) इतर खर्च" या लेखाशीर्षाखाली वेळोवेळी करण्यात येणाऱ्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

महाराष्ट्र शासन

**पोलीस पाटील विशेष उल्लेखनीय सेवा पुरस्कार-**
**सन ...........**

| ........... | ........... | ........... | ........... |
|---|---|---|---|
| (पोलीस पाटलाचे नाव) | (गाव) | (तालुका) | (जिल्हा) |

*मी ------------------ महाराष्ट्र राज्याचा राज्यपाल आपल्या उल्लेखनीय सेवेच्या सन्मानार्थ आपणास उल्लेखनीय सेवा पुरस्कार प्रदान करीत आहे.*

........... (सही)

मुंबई
दिनांक :

राज्यपाल
महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र शासन

## पोलीस पाटील उल्लेखनीय शौर्य पुरस्कार
## सन ...........

| ........... | ........... | ........... | ........... |
|---|---|---|---|
| (पोलीस पाटलाचे नाव) | (गाव) | (तालुका) | (जिल्हा) |

*मी ------------------ महाराष्ट्र राज्याचा राज्यपाल आपल्या अतुलनीय शौर्याच्या सन्मानार्थ आपणास उल्लेखनीय शौर्य पुरस्कार प्रदान करीत आहे.*

........... (सही)
राज्यपाल
महाराष्ट्र राज्य

मुंबई
दिनांक :